# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.


## पेन्शन कर्ज

## (दि.१५/१२/२०२२ पासुन लागू)

१. सदर नियमांस **नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक** या बँकेचे **'पेन्शन कर्ज'** असे संबोधण्यात येईल.

२. कर्जाची मागणी करणारा आपल्या बँकेचा सभासद असावा. तो आपल्या बँकेमार्फत अथवा इतर बँकेतून निवृत्ती वेतन घेणारा असावा. कर्ज मागणी करणारा फॅमीली पेन्शनर नसावा.

३. रुपये १ लाखापर्यतच्या कर्जासाठी एक व त्यावरील कर्जासाठी दोन सक्षम जामीनदार द्यावे लागतील. आपल्या बँकेतून पेन्शन घेणाऱ्या सभासदास नियमित सभासद किंवा पेन्शन खाते असणारा सभासद जामीनदार म्हणून घेता येईल.

४. इतर बँकेतून पेन्शन घेणाऱ्या सभासदांस पेन्शन कर्ज घ्यावयाचे असल्यास त्याला सेवेतील कार्यरत असणारे आपल्या बँकेचे नियमित सभासदच जामीनदार म्हणुन दयावे लागतील.

५. इतर बँकेतून पेन्शन कर्ज घेणाऱ्या सभासदास तेथील खात्याचा ६ महिने पासुनचा खाते उतारा सोबत जोडावा लागेल.

६. पेन्शन कर्जाची मर्यादा किमान रु.५,०००/- व कमाल रु.२,००,०००/- (अक्षरी रु.दोन लाख मात्र) इतकी राहील.

७. पेन्शन कर्ज मागणी अर्जावर वारसदारांची संमतीदर्शक स्वाक्षरी असणे आवश्यक राहील. घेतलेल्या कर्जाची परतफेड समान ३६ मासिक हप्त्यात राहील. तसेच कर्जाचा हप्ता पेन्शन खातेतुन प्रथम प्राधान्याने दरमहा वसुल केला जाईल. कर्ज हप्त्याची वसुली लगेचच पुढील महिन्यापासुन सुरु करण्यात येईल. इतर बँकेतुन पेन्शन घेणाऱ्या सभासदाने सदरच्या कर्जाचा हप्ता रोख स्वरुपात अथवा चेकने जमा करावयाचा आहे.

८. कर्ज मंजूर करतांना कर्जाचा हप्ता वजा जाता १/३ निवृत्ती वेतन हातात पडणे आवश्यक आहे.

९. पेन्शन कर्ज घेतल्यानंतर दुर्दैवाने कर्जदार मयत झाल्यास उर्वरीत कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी त्यांचे वारसदार व जामीनदार यांची वैयक्तिक व संयुक्तिक अशी राहील.

१०. सदर कर्जाच्या व्याजाचा दर द.सा.द.शे. ११.००% इतका राहील. काही कारणाने कर्ज थकल्यास थकीत रक्कमेवर २% जादा दंड व्याज आकारण्यात येईल. तसेच व्याजाचा दर कमी / जास्त असा बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

११. सदर कर्जासाठी बँकेच्या विहीत नमुण्यातील अर्ज परिपुर्ण माहीतीसह, स्टॅम्प पेपर, जामीनदार यांचा फोटो व आवश्यक तेथे स्वाक्षऱ्या इ. माहीती भरुन देणे आवश्यक राहील, नंतरच कर्ज वितरीत केले जाईल.

१२. कर्ज अर्जाची किंमत रु.१०/- अधिक GST रु.०२/- अशी एकुण रु.१२/- इतकी राहील.

वरील नियमांत फेरफार करण्याचा तसेच नवीन नियम घालण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील.

**सदर कर्ज नियमावली संचालक मंडळ सभा दि.११/१२/२०२२ ठराव क्र. १२ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.१५/१२/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहे.**

प्रशासकीय कार्यालय नाशिक

| (सुरेश पाटील) | (मंदाकिनी पवार) | (सुधीर पगार) |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्षा | अध्यक्ष |